# जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली.
## (जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, हिंगोली.)

तात्काळ/महत्वाचे

जा.क्र.२०२०/आ.व्य./कोरोना-तपासणी/कावी- 227
दि.११.०५.२०२०

**विषय:- परिवहन महामंडळाच्या बस द्वारे जिल्ह्यात येणाऱ्या हिंगोली येथील मूळ नागरिकांच्या तपासणी बाबत.**

**वाचा:**
**१.आपत्ती व्यवस्थापन कायदा२००५ नुसार.**
**२.साथ रोग प्रतिबंध कायदा १९७८ नुसार.**
**३.फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३**
**४.या कार्यालयाचे या विषयाचेआदेश क्र.२०२०/आ.व्य./को.वि./कावी-२१८ दि.२८.०४.२०२०**
**५.महाराष्ट्र शासन आदेश क्र.DMU/२०२०/CR.92/DIsM-1 दि.३०.०४.२०२०**
**६.महाराष्ट्र शासन नि.क्र.डीएमयु-२०२०/प्र.क्र.९२/आव्यक्र-१ दि.०९.०५.२०२०**

**आदेश**

ज्याअर्थीराज्य शासनाने करोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३.०३.२०२० पासून लागू करून खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.त्याअन्वये जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात (कोव्हीड १९) नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

ज्याअर्थी संदर्भ क्र.५ नुसार lockdown मुळे अडकलेल्या नागरिकांना आपल्या मूळ गावी जाण्यासाठी शासनाने कार्यपद्धती विहित केली आहे. व संदर्भ क्र.६ नुसार राज्यातील अडकलेल्या नागरिकांना त्यांचे मूळ जिल्ह्यात परिवहन महामंडळाच्या बसेस द्वारे सोडण्याबाबत निर्णय झाला आहे, यानुसार राज्यात अडकलेले हिंगोली जिल्ह्यातील नागरिक मोठ्या प्रमाणाततत्यांचे मूळ गावी येण्याची शक्यता लक्षात घेता बस स्थानकावर येणाऱ्या नागरिकांची RRT पथकामार्फततपासणी करण्यासाठी बसस्थानकावर तहसील कार्यालयाचे व आरोग्य विभागाचे बैठे पथक नेमण्याबाबत निर्णय झाला आहे.

त्याअर्थी मी रुचेश जयवंशी, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, हिंगोलीमला प्राप्त अधिकारा नुसार बाहेरील राज्यातून तसेच बाहेर जिल्ह्यातून हिंगोली जिल्ह्यात येणाऱ्या नागरिकांची तपासणीकरणे आवश्यक आहे. सदर तपासणी करण्यासाठी बस स्थानकावर एक वैद्यकीय पथक, एक पोलीस पथक व इतर विभागाचे पथकनियुक्त करण्यात यावे. सदर पथकांमार्फत बसस्थानकावरच कोरोनाच्या अनुषंगाने थर्मल गन व इतर वैद्यकीय तपासणी साहित्याच्या माध्यमातूननागरिकांचीतपासणी करावी. सदर तपासणी मध्ये ज्या नागरिकांमध्ये कोणत्याही प्रकारचे कोरोना सदृश्य लक्षणे आढळले नाहीत अशांना Home Quarantineचा शिक्का मारावा व त्यांना Home Quarantine करून RRT पथकामार्फत वेळोवेळी त्यांची तपासणीकरण्यात यावी. तसेच ज्या व्यक्तीमध्ये कोरोना सदृश्य लक्षणे आढळतील अशांना लक्षणानुसार CCC, DCHC, DHC अशा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करावे.

त्यानुसार वरीलप्रमाणे कार्यवाही करूनदैनंदिन स्वरूपाचा अहवाल जसे हिंगोली जिल्ह्यात आलेल्या नागरिकांची प्रवास व इतर संपूर्ण माहिती, Home Quarantine व CCC, DCHC, DHC रुग्णालयात दाखल केलेल्या नागरिकांची सविस्तर माहिती असा दैनंदिन अहवाल पथक प्रमुखयांच्या मार्फत एकत्रित करूनउपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जि.प. हिंगोली व जिल्हा प्रशासन अधिकारी, न.पा.प्र.हिंगोली यांनी अपर जिल्हाधिकारी यांना सादर करावा.

त्यानुसार वरीलप्रमाणे आदेशाची अवज्ञा करणाऱ्या, निष्काळजी करणाऱ्याकोणत्याही व्यक्तीने भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र असलेला अपराध केला आहे असे मानण्यात येईल. तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, साथरोग प्रतिबंध कायदा १८९७, महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अंतर्गत संबंधितावर कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**(रुचेश जयवंशी,भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, हिंगोली.**

**प्रतिलिपी:**

१. मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना माहितीस्तव.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली. यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
३. पोलीस अधिक्षक, हिंगोली यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
४. उपविभागीय अधिकारी हिंगोली/कळमनुरी/वसमत यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
५. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),जि.प.हिंगोली
६. जिल्हा शल्यचिकित्सक, हिंगोली यांना आवश्यक त्या योग्य कार्यवाहीस्तव.
७. जिल्हा आरोग्य अधिकारी,जि.प.हिंगोली यांना आवश्यक त्या योग्य कार्यवाहीस्तव.
८. तहसीलदार हिंगोली/वसमत/औंढा ना./सेनगाव/कळमनुरी यांना वरीलप्रमाणे कार्यवाहीस्तव.
९. जिल्हा माहिती अधिकारी, यांना वरीलप्रमाणे प्रसिद्धीसाठी.

**(रुचेश जयवंशी,भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, हिंगोली.**

Scanned by CamScanner